# <u>बेरोजगारी एक समस्या</u>

**डॉ.एन.के.मुळे**
**(अर्थशास्त्र विभाग)**
**सुंदरराव सोळंके महाविद्यालय,**
**माजलगांव,बीड**

**आकाशनाथ दतात्राय बोरकर**
**संशोधक विद्यार्थी (अर्थशास्त्र विभाग)**
**डॉ.बा.आं.विद्यापीठ औरंगाबाद**

**<u>प्रस्तावना :-</u>**

भारत हा विकसनशिल देश असून भारतासमोर अनेक समस्या आहे त्यातली सर्वांत मोठी समस्या म्हणजे बेरोजगारी आहे. भारताने 2018 पासून लोकसंख्याशास्त्रीय सुवर्णकाळात प्रवेश केला.पहिल्यांदाच भारतातील 15 ते 64 वयोगटातील लोकसंख्या त्या वयोगटाबाहेरील लोकसंख्येपेक्षा जास्त आहे. म्हणजे कमवू शकणाऱ्या नागरिकांची संख्या ही परावलंबी लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. ही एक मोठी संधी आहे. प्रत्यक्षात आज भारतात बेरोजगारीचे प्रमाण सतत वाढते आहे. देशात कोरोना महामारीमुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या आणि बेरोजगारीची समस्या पुन्हा एकदा समोर आली. सेंटर फॉर मॉनिटरींग इंडीयन इकॉनॉमीने (CMIE) जारी केलेल्या अहवालानुसार भारतात बेरोजगारांची संख्या डिसेंबर 2021 पर्यंत 5.3 कोटी इतकी समोर आली आहे. उल्लेखनीय म्हणजे यात महिलांचा आकडासुध्दा मोठा आहे.

सीएमआयईच्या अहवालानुसार जे काम शोधत आहे, त्यांची संख्या सर्वाधीक आहे. जवळपास 3.5 कोटी लोक कामाच्या शोधात आहे यामध्ये 80 लाख महिलांचा समावेश आहे आणि हे चिंताजनक बाब असल्याचे अहवालात म्हटले आहे तर 5.3 कोटी बेरोजगारीच्या आकडेवारीत महिलांचा आकडा 1.7 कोटी आहे.



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

भारताचा बेरोजगारी दर खुप वाढला असून हे भारतासमोर आव्हान असल्याचे सीएमआयईच्या अहवालात म्हटले आहे . भारतात केवळ 38 टक्के लोकांनाच रोजगार मिळत असल्याने देशात रोजगार उपलब्ध करुन देण्याची गरज असल्याचे सीएमआयई म्हटले आहे तर भारताला प्रबळ अर्थव्यवस्था बनवण्यासाठी जवळपास 60 टक्के लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करुन द्यावा लागणार अस ल्याचेही सीएमआयईने स्पष्ट केले आहे .

**बेरोजगारी संकल्पना :-**

बेरोजगारी शब्द अशा स्थितीला सुचित करतो की ज्यामध्ये एखादी व्यक्ती सक्रीय पणे रोजगार शोधते परंतू तो मिळत नसल्याने अयशस्वी ठरते . अर्थव्यवस्थेच्या बळकटीचा रोजगार निर्मिती हा एक महत्त्वाचा उपाय असल्याचे म्हटले जाते . त्याचप्रमाणे देशाचा बेरोजगारीचा दर त्या अर्थव्यवस्थेची कमजोरी अधोरेखित करतो . एखाद्या देशाच्या कामगार , श्रमिकांच्या समावेशासह एकुण लोकसंख्येच्या नोकऱ्या नसलेल्या लोकांच्या संख्येने विभाजित करुन जी संख्या पुढे येते त्याला बेरोजगारीचा दर म्हटले जाते .

बेरोजगारी हा मानव विकासाचा एक प्रमुख अर्थिक निकष आहे . कारण तो निरोगी, शिक्षीत आणि आजीविका मिळविण्यासाठी इच्छुक व्यक्तींची क्षमता (किंवा अक्षमता) दर्शवितो. सेवानिवृत्ती, अपंगत्व, उच्च शिक्षण घेणे इत्यादी विविध कारणांमुळे काम करण्यास असमर्थ असलेल्या लोकांना यातून वगळण्यात आले आहे . देशाचा बेरोजगारीचा दर जितका जास्त असेल तितकी त्याची आर्थिक वाढ कमी उत्पादक आहे , असे मानले जाते .रोजगार नसतानाही लोक संसाधनांचा सतत वापर करतात . देशाच्या अर्थव्यवस्थेला व्यवहार्य फायदेशीर योगदान न देता ही संसाधने केवळ वापरली जातात . सतत उच्च बेरोजगारीचा दर हा देशातील आर्थिक संकटाचा एक महत्त्वपुर्ण सुचक आहे आणि त्याचे सामाजिक



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

आणि राजकीय परिणाम देखील असू शकतात ज्यामुळे अंतर्गत संरचनेचा -हास होतो .

दुसरीकडे, कमी बेरोजगारीचा दर अर्थव्यवस्थेत उपलब्ध श्रमाचा जास्तीत जास्त वापर , उच्च वेतन वाढ आणि जीवनमानात एकुण वाढ दर्शवते. देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी एक आदर्श राज्य म्हणजे त्याच्या संभाव्य कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त उत्पादन घेणे . तथापि, अल्प बेरोजगारीचा दर हा अर्थव्यवस्थेवरील ताणाची निदर्शक असते , ज्यामुळे चलनवाढ होते आणि अतिरीक्त मजुरांची गरज असतानाही नियोक्तांना त्यांना सामावून न घेता यावे अशी प्रतिकुल परिस्थिती त्यातुन निर्माण होत असते .अर्थशास्त्रज्ञांव्दारे बेरोजगारीचे ठळकरुपात दोन श्रेणींमध्ये विभागली केली गेली आहे . ऐच्छिक आणि अनैच्छिक.स्वैच्छिक बेरोज गारी म्हणजे कोणत्याही बाहय परिस्थितीशिवाय स्वत:च्या इच्छेने इतर प्रकारचे काम शोधण्यासाठी मागील नोकरी सोडण्याचा निर्णयातून दिसून येते .

अनैच्छिक बेरोजगारी म्हणजे जेव्हा एखादी व्यक्ती विविध कारणांमुळे नोकरी गमावते , जसे की नोकर कपात , टाळेबंदी, कामावरुन काढून टाकण्याच्या परिणामी आलेली बेरोजगारी होय . त्यांचा नियोक्ता कर्मचाऱ्यांची देखभाल करण्यास अक्षम आहे आणि आता इतर निर्वाहासाठी पर्याय शोधणे कामागारांसाठी आवश्यक बनते .

**<u>बेरोजगारीची आकडेवारी मांडण्याची पध्दत :-</u>**

बेरोजगारीची आकडेवारी मांडतांना एक कार्यरत (एम्प्लॉईड) असणारे , दुस रे कामाचा शोध न घेणारे आणि तिसरे, जे शोधात आहेत परंतू त्यांना काम किंवा नोकरी मिळत नाही असे . एनएसएसओ ही राष्ट्रीय सर्वेक्षण संस्था आहे , ज्यांचे काही निकष असतात . सर्वेक्षणाच्या तारखेआधी किमान शंभर दिवस (तीन महिने) जी व्यक्ती कामाचा शोध घेत आहे , परंतू कामाची संधी मिळाली नाही



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

अशा व्यक्तींला बेरोजगार समजले जाते . याचा अर्थ नोकरीसाठी प्रयत्न न करणाऱ्या नागरीकांना यातून वगळले जाते . आकडेवारी तीन प्रकारे मांडली जाते एक वार्षिक ज्यात सर्वेक्षणाच्या दिवसाआधी एक वर्ष किंवा 365 दिवस नोकरीची संधी न मिळालेले साप्ताहिक म्हणजे आठवडाभरात एकही कामाची संधी न मिळालेले आणि दैनिक म्हणजे दिवसभरात तासाभराच्या कामाची संधी न मिळू शकलेले नागरीक. कामाची संधी मिळूनही कोणत्याही कारणास्तव ती संधी न स्विकारणाऱ्यांची यात गणना होत नाही. उदाहणार्थ. एकुण 1000 इतकी 15 ते 64 वयोगटातील लोकसंख्या पकडली आणि त्यातील 50 टक्के म्हणजे 500 व्यक्ती कार्यक्षम आहेत असे समजू . जर बरोजगारीचा दर 5 टक्के पकडला तर त्याचा अर्थ 500 पैकी 25 व्यक्ती सक्रियपणे कामाच्या शोधात होत्या. परंतू , त्यांना काम मिळू शकले नाही. जर त्या 25 पैकी दहा लोकांनी कोणत्याही कारणास्तव काम शोधायचे बंद केले तर कामगार शक्ती 500 वरुन घसरुन 490 पकडली जाते आणि त्या आकडयाच्या आधारावर बेरोजगारीचा दर मोजला जातो . म्हणजेच काम नसणाऱ्या नागरीकांच्या संख्येत घट न होता देखील बेरोजगारीचा दर मात्र घटतो . याला छुपी बेरोजगारी म्हणतात. मागील काही वर्षात नागरीकांमध्ये रोजगाराप्रती आलेले औदासिन्य पाहता , ही समस्या अधिक गंभीर बनते . शिवाय बेराजगारीच्या जोडीला अल्प बेरोजगारी देखील आहेच अल्पबेरोजगारीचे उदाहरण म्हणजे जर एखादा मजूर दिवसभरात 12 ते 14 तास काम शोधतो . परंतू 2 ते 3 तासांचे काम उपलब्ध होत असेल तर त्यांनाही बेरोजगार समजले जात नाही. सेंट्रल पब्लिक सेक्टर एंटरप्राजजेस या केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेच्या आकडेवारीनुसार या क्षेत्रातील नोकरीच्या संधी सतत कमी होत आहेत . अगदी 2018/19 च्या सर्वेक्षणानुसार 2009/10 मध्ये असलेली कर्मचाऱ्यांची संख्या 14.90 लाखांवरुन 2018/19 मध्ये 10.33 लाख इतकी खाली आली पण या नोक -यांचे आकर्षण मात्र कमी झाले नाही कारण संधी कमी झाल्या तरी मानधनात सतत वाढ झाली. नोकरीची शाश्वती, इतर



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

भत्ते व सुविधा या व्यतिरिक्त जर दहा वर्षात सरासरी पगार 5.89 लाख वरुन 14.78 लाख रुपये झाला . म्हणूनच शिपाई किंवा इतर कनिष्ठ पदासाठी हजारोंच्या संख्येने अर्ज असतात . ज्यात पदवीधर , इंजिनीअर , इतर उच्चशिक्षित असतात .

असंघटित किंवा अनौपचारिक अर्थव्यवस्थेचा वाटा 50 टक्के असून 90 टक्के रोजगाराच्या संधी मात्र या क्षेत्रातून उपलब्ध होतात हे क्षेत्र जास्त असुरक्षित व प्रभावित आहे . या क्षेत्रातील आकडेवारी नसल्यामुळे बेरोजगारीच्या समस्येचे गांभीर्य जनतेसमोर येत नाही. श्रमअर्थतज्ज्ञ राधिका कपूर यांच्या मते बेरोजारी ही 'चैन ' शिक्षित किंवा बरी आर्थिक परिस्थिती असलेल्यांना परवडू शकते . गरीब, अर्धशिक्षित किंवा अकुशल कामगारांचे तेवढे भाग्य नाही म्हणजेच पडेल ते मिळेल त्या मोबदल्यात काम करण्याव्यतिरीक्त पर्याय नसलेली मोठी लोकसंख्या जगण्यासाठी झगडत आहे एकुण वर्कफोर्सपैकी 75 टक्के स्वयंरोजगारीत किंवा पडेल ते काम करणाऱ्या श्रेणीतील आहेत , ज्यांना कोणत्याही सुविधा, भत्ते किंवा सुरक्षितता नाही. निवृत्तीवेतन, आरोग्य विमा, तीन वर्षांपेक्षा जास्त काळ नोकरीची हमी , या व असल्या सुविधा असलेल्या नोकऱ्या करणाऱ्यांचे प्रमाण अंदाजे 2 टक्के इतके कमी आहे आणि फक्त नऊ टक्के नागरिकांना नोकरीमध्ये किमान एका सामाजिक सुरक्षेती हमी असलेली नोकरी आहे . थोडक्यात बेरोजगारीचे भीतीदायक वाटणारे आकडे एकंदरीत अर्थव्यवस्थेचे खरे विदारक दृश्य दर्शवित नाहीत.

आधीच मंदीच्या संकटांमुळ कंबरड मोडलेल्या आशियातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असलेल्या भारताला कोरोनाच्या साथीन आणखी एक धक्का दिला आहे .



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

**202 0 मधील बेरोजगदारचा दर :-**

मागणीत झालेली मोठी घट आणि वाढलेला सरकारी खर्च यामुळं हे संकट अधिक गहिरं होत आहे .मात्र, नोकऱ्यांची संख्याच कमी होत चालली आहे . सेंटर फॉर मॉनिटरींग इंडीयन इकॉनॉमी म्हणजे CMIE ही एक स्वतंत्र थिंक टँक आहे . या संस्थेच्या आकडेवारीनुसार भारतातील बेरोजगारीचा दर हा डिसेंबरमध्ये 8% पर्यंत वाढला आहे .2020 आणि 2021 मध्ये देखील बराच काळ हा दर 7% ट क्कांपेक्षा अधिक होता .1991 मध्ये देशात भयंकर आर्थिक मंदी आली होती (आयातिचे पैसे देण्यासाठीही देशात पुरेसं परकीय चलन उपलब्ध नव्हतं) त्याहीपेक्षा आणि जवळपास गेल्या तीन दशकांमधील सर्वाधिक असं हे प्रमाण आहे असे जागतिक बँकेचे माजी प्रमुख अर्थतज्ज्ञ कौशिक बासू यांचे मत आहे . 2020 मध्ये बहुतांश देशामध्ये बेरोजगारी वाढल्याचं पाहायला मिळालं. पण भारताचा बेरोजगारी वाढीचा दर हा बांगलादेश (5.3%), मेक्सिको (4.7%) आणि व्हिएतनाम (2.3%) या नव्यानं उदयास येणा -या अर्थव्यवस्थांपेक्षाही जास्त होता . CMIE च्या माहितीनुसार पगारी नोकऱ्यांचं प्रमाणही कमी झालं आहे . कंपन्यांनी मनुष्यबळ आणि खर्च कमी करण्यासाठी साथीचा फायदा घेतल्यामुळं हे घडलं असल्याची शक्यता आहे . अझिम प्रेमजी विद्यापीठानं केलेल्या अभ्यासातून समोर आलेल्या तथ्यांनुसार 2020 च्या लॉकडाऊनमध्ये 15 ते 23 वयोगटातील तरुण कामगारांना सर्वाधीक फटका बसला .

लॉकडाऊनच्या पुर्वी जे पगारी काम करत होते , त्यांना लॉकडाऊननंतर पुन्ही ती कामं परत मिळाली नाहीत, पण नोकऱ्यांमध्ये अचानक ही मोठी घट होण्यासाठी कोरोनाची साथ ही काही अंशीच जबाबदार असल्याचं अर्थतज्ज्ञांचं मत आहे .

देशातील काम क रणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येत नोकऱ्या असणाऱ्यांची संख्या घटली आहे . 15 वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक वयोगटातील काम करणाऱ्या महिलांचं प्रमाण भारतात जगामध्ये सर्वांत कमी आहे .



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

एखादी व्यक्ती जेवढी जास्त शिकलेली असेल तेवढी ती बेरोजगार राहण्याची अधिक शक्यता असते किंवा कमी मोबदल्याचं अनौपचारीक काम करण्याची त्यांची तयारी नसते .दुसरीकडे गरीबांना शिक्षणाची फारशी संधी नसते . त्यामुळं समोर किंवा वाटयाला येईल ते काम करण्यास ते तयार असतात . त्यामुळं बेरोजगारीच्या आकडयांवरुन अर्थव्यवस्थेतील एकुण कामगारांच्या आकडयाबाबत फार शी माहिती मिळत नाही. देशातील एकुण मनुष्यबळापैकी तीन चतुर्थांश मनुष्यबळ हे स्वयं रोजगार आणि अनौपचारीक काम करणारं आहे . त्यांना सामाजिक सुरक्षेचे लाभही मिळत नाहीत.केवळ 2% मनुष्यबळाला या औपचारीक आणि सामाजिक सुरक्षा असलेल्या नोकऱ्या आहेत . या सामाजिक सुरक्षेत निवृत्ती बचत योजना , आरोग्य योजना , प्रसुतीसाठीचे लाभ , तीन वर्षांपेक्षा जास्तचे लेखी करार याचा समावेश होतो . तर केवळ 9% लोकांकडे असलेल्या नोकऱ्यांत वरीलपैकी एका सामाजिक सुरक्षेचा लाभ मिळतो.चांगला विकासदर असूनही देशातील बेरोजगारीच्या या स्थितीमागचं एक प्रमुख कारण हे पुर्वीच्या कृषी आधारीत अर्थव्यवस्थेकडून सेवा आधारीत अर्थव्यवस्थेकडे होणारं स्थित्यंतर हे आहे . भारतासारख्या दुसऱ्या कोणत्याही देशांमध्ये विकास हा उत्पादनाच्या नव्हे तर सेवांच्या आधारावर झालेला आढळत नाही. भारताचा विकास हा सॉफ्टवेअर आणि आर्थिक क्षेत्रातील सेवांच्या कुशल मनुष्यबळाच्या जोरावर झालेला दिसून येतो .

भारतातील बेरोजगारीचा मुददा हा चिंताजनक आहे . कारण देशाच्या विकासाचा वेग वाढत असताना तळाला असलेल्या क्षेत्राची कामगिरी मात्र इतर बहुतांश देशांच्या तुलनेनं वाईट आहे .

**<u>जुन 2022 ची आकडेवारी :-</u>**

जुन 2022 च्या आकडेवारीनुसार, मे 2022 मध्ये उपलब्ध असणाऱ्या 40.04 कोटी नोक -या एक कोटीने कमी झाल्या. बेरोजगारीचा दर वाढून 7.8



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

टक्के झाला , शहरी भागातील बेरोजगारी 7.3 तर ग्रामीण भागातील 8.03 टक्के आहे . मे 2016 मध्ये भारताची कार्यक्षम लोकसंख्या अंदाजे 95 कोटी हो ती . पाच वर्षात 11 कोटींची भर पडून ती फेब्रुवारी 21 मध्ये 106 कोटींपर्यंत गेली. मे 16 मध्ये 95 कोटींमध्ये 46 कोटी नागरीक या कामगारशक्तीचा (लेबर फोर्स) भाग होते . फेब्रुवारी 21 मध्ये 106 कोटीपैकी 46 कोटींपर्यंत खाली आहे . एप्रिल 202 0 मध्ये कोरोना काळात ते आण खी घसरले . आज ते एकुण श्रमशक्तीच्या 38.8 टक्के इतर कमी आहे . मागच्या वर्षीच्या जानेवारीत 20 ते 24 वयोगातील भारतातील बेरोजगारी 63 टक्के होती , तर तेच प्रमाण 20 ते 21 वयोगटात 40 टक्के होते . सध्या तरुण बेरोजगारांची संख्या अंदाजे 25 टक्के आहे .

देशातील 27 स्टार्टअपमध्ये दहा हजारांपेक्षा जासत कामगार कपात झाली. दैनंदीन व्यवहारात, नोकरी धंद्यात व अर्थकारणात स्त्रियांचा सहभाग 25 वरुन 11 टक्के व शहरी भागात हे प्रमाण 6.56 टक्के इतके खाली आले . ( बांगला देशात अर्थकारणातील स्त्री सहभाग मागील दहा वर्षात साधारण दहा टक्कांनी वा ढून 30 टक्के झाला आहे . ) जगातील तरुण व स्त्रियांच्या लेबर फोर्स मधल्या सहभागात भारताचा क्रमांक तळाचा आहे . जागतिक बँकेचे पूर्व प्रमुख अर्थशास्त्रज्ञ कौशिक बासू यांच्या मते , भारतातला आजही बेरोजगारीची समस्या ही गेल्या तीन दशकातील सर्वात भीषण आहे . त्या देशात ल्या बेरोजगारीचं प्रमाण आतापर्यंतचं सर्वाधीक म्हणजे 7.9% वर पोहोचलेलं दिसतंय .

**बेरोजगारी वाढण्याची कारणे :-**

मागच्या तीन वर्षात कोव्हिडमुळे अनेकांना नोकरी गमावणं पगार कपात किंवा असलेल्या नोकरीत अनिश्चितता यांचा सामना करावा लागला आहे .



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

याचा परिणाम म्हणून 2020 मध्ये तब्बल 3,548 तरुण-तरुणींनी हतबलतेतून आत्महत्याही केल्या. 2020 च्या शेवटच्या तिमाहीसाठी सेंटर फॉर मॉनिटरींग इंडीयन इकॉनॉमी या राष्ट्रीय संस्थेनं सादर केलेली आकडेवारीच बघा .

देशातला बेरोजगारीचा दर ऑक्टोंबर 2020 मध्ये 7 टक्के, नोव्हेंबरमध्ये 7.75% आणि डिसेंबरमध्ये उच्चांकी 7.91% वर पोहोचलाय . यातही शहरी बेरोजगारी 9.30% आणि ग्रामीण बेरोजगारी 7.28% आहे .
ISPOS या जागतिक संस्थेनं केलेल्या वर्ल्ड ग्लोबल सर्व्हे मध्ये 70% भारतीयांनी कोरोना व्हायरसच्या बरोबरीने बेरोजगारी आणि रोजगार सुरक्षितता यांची काळजी वाटत असल्याचा कौल दिला होता . बांगलादेश (5.3%), व्हिएतनाम (2.3%) आणि मेक्सिको (4.7%) या नुकत्या उदयाला येणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारताची 2020 मधली कामगिरी रोजगाराच्या बाबतीत खालावलेली आहे यातच सगळं आलं . जागतीक बँकेचे माजी प्रमुख अर्थतज्ज्ञ कौशिक बासू यांच्या मते , '1991 मध्ये भारतात आर्थिक मंदी आली होती . रोजगार विषयक समस्याही त्यातुन निर्माण झाली. पण , त्यावर्षीच्या आणि मागच्या तीन दशकांच्या तुलनेत देशात आताचा बेरोजगारीचा दर सर्वाधिक आहे '.

## 1. नोटबंदी -

भारत सरकारने 2016 मध्ये नोटबंदीसारखा निर्णय घेतला गेला ज्याचे दुष्पपरिणाम विविध व्यवसायांवर व त्या क्षेत्रातील नोकऱ्यांवर झाले . त्या पाठोपाठ आलेल्या जीएसटीच्या अंमलबजावणीतील त्रुटींनी तेवढाच हातभार लागला . 2011/12 मध्ये देशातील जीडीपीच्या 34.31 टक्के इतके प्रमाण देशातील व्यवसायात होणाऱ्या गुंतवणुकीचे होते . 20/21 मध्ये ते 30.91 टक्के झाले . याचा अर्थ एकुण उत्पन्नापैकी जी रक्कम उद्योग किंवा व्यवसाय निर्मितीमध्ये होत होती त्या घट झाली. आज बेरोजगारी ही देशाची सर्वांत मोठी समस्या आहे .



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

**2. कोरोनाचा उद्रेक -**

2017 पासून पुढची तीन वर्षे देशात बेरोजगारीचा दर हा 5 ते 6 टक्कयांमध्ये सिमित होता . आणि तो घटता म्हणजे कमी होणारा होता पण , कोरोना उद्रेकानंतर 2020 च्या मार्चमध्ये राष्ट्रीय लॉकडाऊन लागलं . आर्थिक घडामोडी आणि व्यवहारांवर बंधनं आली आणि त्याचा थेट फटका रोजगाराला बसला . काही ठिकाणी पगार कपात झाली तर काही ठिकाणीऑनलाईन कामाचं प्रमाण वाढल्यामुळे मनुष्यबळाची गरज कमी झाली.

**3. ग्रामीण रोजगाराच्या अपुऱ्या संधी -**

गेली अनेक दशकं भारताला ही सामाजिक समस्या सतावतेय . शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात रोजगाराच्या पुरेशा संधी मिळत नाहीत.

गावात असलेले कुटीर उद्योग, लघु उद्योग आणि शेतीशी संबंधीत उद्योग अलीकडच्या काळात कमी झाले आहेत .

**4. बेरोजगारीचं ढिसाळ नियोजन :-**

प्रत्येक देशात बेरोजगारीच्या नियोजनासाठी एक यंत्रणा असते . आणि लोकसंख्या वाढ ज्या प्रमाणात होते त्याप्रमाणात रोजगार निर्मिती व्हावी असा एक ठोकताळा असतो . पण , भारतात हे नियोजन पुर्वीपासूनच नीट झालं नसल्याचं अर्थतज्ज्ञ सांगतात .

कोरोना काळात सरकारने मनरेगाची कामं वाढवून ग्रामीण रोजगार देण्यासाठी प्रयत्न केले . पण , सरकारी नोकऱ्यांचं प्रमाण वाढवण्याची गरज होती ते झालं नाही. शिवाय या भरती परिक्षांमध्ये झालेल्या गोंधळांमुळे उलट तरुणांमध्ये उद्रेक बघायला मिळाला.

- **बेरोजगारीवर उपाय :-**

देशातली बेरोजगारीची स्थिती जी आकडयातून दिसते, त्याहून काही अंशी जास्त भीषण आहे . कारण , सर्वेक्षण असं सांगतं की, 98% लोक असंघटीत



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

क्षेत्रात किंवा अनियमित स्वरुपात काम करतात . त्यामुळे त्यांना निवृत्ती वेतन , आरोग्यविमा यासारख्या सवलती मिळत नाहीत. 15 ते 23 वयोगटातल्या तरुणांमध्ये बेरोजगारीचं प्रमाण् सर्वाधीक आहे . म्हणजे तरुणांना नवीन संधी मिळत नाहीत.कोरोना परिस्थितीमुळे बेरोजगारीचा प्रश्न आणखी बिकट झाला य हे उघड आहे .

देशात सध्या तरुण लोकसंख्या जास्त आहे . एक प्रकारचा तरुण शहरात वाढलेला , सोशल मिडीया आणि इतर तंत्रज्ञानामध्ये प्रवीण असा आत्ममग्न, प्रवीण कुशल भारतीय तरुण आहे तर दुस ऱ्या प्रकारचा तरुण वर्ग ग्रामीण भागातून येतो , ज्याला पुरेशा शिक्षण आणि रोजागारांच्या संधी नाहीत पण सध्या या दोन्ही वर्गांमध्ये नैराश्य दिसून येत आहे . कारण हाताला काम नाही त्यामुळे अर्थकारणाबरोबरच ही एक सामाजिक समस्याही बनली आहे . शेती आणि शेतीतून निर्माण होणारा रोजगार यात व्यवसायिकता आली पाहिजे. तर शहरी भागात औद्योगिक वाढ झपाट याने होतेय पण ती भांडवलकेंद्री आहे ती जनकेंद्री झाली पाहिजे तंत्रज्ञानाच्या वापरामुळे नोक -या जाण्यापेक्षा तंत्रज्ञान वापरल्यामुळे नवीन प्रकारच्या रोजगाराच्या संधी कशा निर्माण होतील याचाही अभ्यास झाला पाहिजे यासाठी केंद्र सरकारची यंत्रणा कामाला लागली पाहीजे तसंच सरकारी नोकऱ्याचं प्रमाण आधीच कमी होतंय त्यात नोकर भरतीमध्ये होणारे घोटाळे आणि ढिसाळ कारभार याकडेही सरकारने कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. सध्या खरंतर भारताबरोबरच जगातली कोरोनामुळे रोजागाराची स्थिती फारशी बरी नाहीए पण भारतात तरुणांची संख्या जास्त आहे आणि पदवी घेऊन बाहेर पडलेल्यांसाठी पुरेशा संधी मिळत नाहीएत ही वस्तुस्थिती आहे . तसेच सरकारी नोकऱ्याचं प्रमाण आधीच कमी होतय त्यात नोकर भरतीमध्ये होणारे घोटाळे आणि ढिसाळ कारभार याकडेही सरकारने लक्ष दिले पाहिजे.



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

**समारोप :-**

भारताची आता पर्यंत झालेली प्रगती ती कृषी अर्थव्यवस्थेपासून सेवाक्षेत्रावर आधारीत अर्थव्यवस्थेच्या दिशेने झाली आहे त्या सॉफ्टवेअर किंवा वित्तीय सेवा यासारख्या अर्थव्यवस्थेने केवळ सेवा क्षेत्रावर विसंबून न राहता वस्तुनिर्मिती किंवा उत्पादनावर भर दिला पा हिजे. कारण सेवा क्षेत्रामध्ये उच्चशिक्षित व कु शल कामगारांनाच सहभागी होता येते त्या विपरीत उत्पादन क्षेत्रात अल्पशिक्षित किंवा अकुशल कामगारांनासुध्दा रोजगाराच्या संधी उपलबध होतात .

लोकसंख्याशास्त्रीय सुवर्णकाळ असलेल्या काळाचा फायदा घेणाऱ्या देशांनी त्याचा अंदाज घेऊन मोठे कारखाने चालु केले , उत्पादन क्षमता वाढवली व लोकसंख्याशास्त्रीयस सुवर्णकाळ असलेल्या काळाचा फायदा घेणाऱ्या देशांनी त्याचा अंदाज घेऊन मोठे कारखाने चालु केले , उत्पादन क्षमता वाढवली व त्याच बरोबरीने किमान दशकभर आधीपासून शिक्षण व कौशल्य क्षेत्रामध्ये गुंतवणुक केली. भारतात मात्र सहा टक्के हे ध्येय असताना एकुण जीडीपी च्या केवळ तीन टक्के शिक्षणावर खर्च केला जातो .

लघु व मध्यम उद्योग क्षेत्र, कामगारांचे हक्क याबाबतीत सरकारी धोरण ढिसाळ राहिले आहे . भारतात युवकांची संख्या सर्वाधीक आहे 15 ते 29 वयोगटातील युवकांची संख्या एकुण लोकसंख्या 27 टक्के आहे युवकां च्या या शक्तीचा वापर करुन भारत हा जगातील कौशल्य विकासाची राजधानी बनू शकतो . यात अनेक प्रकारची आव्हाने आहेत .सध्याच्या काळात आपल्या देशाकडे मनुष्यबळ अधिक आहे . मनुष्य बळाचे रुपांतर योग्य कौशल्य प्रशिक्षणाच्या मदतीने उत्पादनक्षम मनुष्य बळात केले तर त्याचा उपयोग देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढवण्यासाठी करुन घेता येईल .



Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.

**संदर्भ सुची :-**


1. भारताती ल **बेरोजगारी आणि** रोजगाराचा **हक्क**, डॉ .जे .एफ . **पाटील**, डॉ . व्हि. बी .ककडे , **प्रबोधन प्रकाशन** इंचलकरंजी
2. योजना , **सप्टेंबर** 2018
3. www.bbc.com/marathi 1 फेब्रुवारी 2022
4. **लोकसत्ता** 2 मे 2022
5. महाराष्ट्र टाईम्स 12 **सप्टेंबर** 2022
6. सकाळ 28 **नोव्हेंबर** 2022




Printed by BoltPDF (c) NCH Software. Free for non-commercial use only.